## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १५३ वा | शुक्रवार, दि. १६ जानेवारी २०२६ | पाने: ८ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूरात निवडणूक अधिकाऱ्यानेच भाजपला केले मतदान

## अनेक EVM मध्ये बिघाड, बोगस मतदानाचे प्रकार उघड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महापालिका निवडणुकीच्या मतदानास सकाळी साडेसातपासून सुरुवात झाली आहे. मात्र, अनेक ठिकाणी मतदान यंत्र बंद पडण्याच्या घटना सकाळपासून सुरू आहेत. तसेच, शहरात अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याचे उघड झाले आहे.

मतदार मतदान गेल्यानंतर तुमचे मतदान झाल्याचे निवडणूक अधिकारी सांगत आहेत. पडताळीनंतर त्यांचे बॅलेट पेपरवर मतदान घेतले जात आहे. एक मतदान केंद्रावर चक्क निवडणूक कर्मचाऱ्यानेच भाजपचे बटन दाबल्याचे उघड झाले आहे, त्यामुळे निवडणूक कर्मचाऱ्यांना हाताशी धरून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप खुद्द मतदारांकडूनच होत आहे.

सोलापूरमध्ये सत्ताधारी भाजप हा स्वतंत्रपणे निवडणूक लढवत असून त्यांच्या विरोधात महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्रित लढत आहेत. महाविकास आघाडीही सोलापुरात एकत्रिपणे निवडणूक



लढवत आहे. तसेच असदुद्दीन ओवैसी यांनी दोन सभा घेऊन एमआयएमची वातावरणी निर्मिती करण्याचा प्रयत्न केल आहे.

सोलापूर शहरात अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याचे उघड होत आहे. बाळे शहरात तशा तीन घटना घडल्याचे पुढे आले आहे. त्यात प्रभाग क्रमांक पाचमधील मतदान केंद्र क्रमांक १७ मध्ये दोन, तर मतदार केंद्र क्रमांक २१ मध्ये एक घडली आहे. प्रभाग 3 च्या 4 नंबर केंद्रवारही बोगस मतदान झाल्याचे पुढे आले आहे.

हे सर्व मतदार मतदानासाठी केंद्रावर गेल्यानंतर 'तुमचे मतदान झाले आहे,' असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर संबंधित मतदारांचे बॅलेट पेपरवर मतदान घेण्यात आले आहे. बाळे येथे मंगल वाघमारे, ह्या मतदानासाठी केंद्रावर गेल्या असताना त्यांना तुमचे मतदान झाल्याचे सांगण्यात आले. त्याबाबतचा जाब विचारल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मंगल वाघमारे यांचे मतदान बॅलेट पेपरवर करून घेतले आहे. मात्र, या प्रकाराबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

बाळे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर रेखा सुरवसे यांनाही तोच अनुभव आला आहे. मात्र, त्यांनी मतदान केले नसल्याचे उघड झाल्यानंतर अधिकाऱ्याने त्यांचा रीतसर फॉर्म भरून मतदान (पान 2 वर..)

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज - तहसीलदार लंगुटे

### 8 जिल्हा परिषद गट व 16 पंचायत समिती गणा साठी निवडणूक, 309 मतदान केंद्रे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद 8 गट व पंचायत समितीच्या 16 गणाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचार संहिता अंमलबजावणी व निवडणुका पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.


पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक -2026 चा निवडणुक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. पंढरपूर तालुक्यामध्ये जिल्हा परिषद गट एकूण 08, पंचायत समिती गण एकूण -16 आहेत.

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद गट वाखरी, करकंब, भोसे, गोपाळपूर, टाकळी, कासेगाव, रोपळे, भाळवणी हे ८ जि.प. गट आहेत. तर पंचायत समिती गण उंबरे, करकंब, भोसे, गुरसाळे, रोपळे, सुस्ते, पुळूज, गोपाळपूर, वाखरी, पटवर्धन कुरोली, भाळवणी, पळशी, टाकळी, खर्डी, कासेगाव, सरकोली हे 16 गण आहेत. यासाठी 309 मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

नामनिर्देशन अर्ज, त्यासोबत जोडावयाचे प्रपत्रे, छाननी, उमेदवार माघार, निवडणुक चिन्ह वाटप, मतदान दिवशी घ्यावयाची खबरदारी, (पान 2 वर..)

# आज मतमोजणी, कोण जिंकणार, कोण हरणार?

## १०२ जागांसाठी ५६४ उमेदवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीनंतर १०२ नगरसेवकांसाठी गुरुवारी (ता. १५) मतदान पार पडले. आता ५६४ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. आज (शुक्रवारी) सोलापूर शहरात सात ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

सकाळी दहा वाजता मतमोजणीला सुरूवात होईल. एकूण २६ प्रभागांपैकी प्रभाग १९ आणि २२ मध्ये चार फेऱ्या होतील. प्रभाग २० च्या पाच आणि प्रभाग २६ च्या दोन फेऱ्या असणार आहेत. बाकीच्या सर्व प्रभागांचा निकाल तीन फेऱ्यांमध्ये जाहीर होणार आहे. दुपारी दोन वाजेपर्यंत निकाल स्पष्ट होणार आहे.

सोलापूर महापालिकेच्या २६ प्रभागांतील १०२ जागांसाठी मतदान पार पडले. आता शहराच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार, याचा तर्कवितर्क लढविला जात आहे. प्रत्येक उमेदवाराने आपणच विजयी होणार, असा विश्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, गुरुवारी सकाळी साडेसात वाजल्यापासून सोलापूर शहरातील ३५३ इमारतींमधील १०९१ मतदान केंद्रांवर मतदानाला सुरुवात झाली. दुपारी उन्हाचा त्रास टाळण्यासाठी ज्येष्ठ नागरिक, महिला आणि दिव्यांग मतदारांनी सकाळच्या सत्रातच मतदान केले. बहुतांश उमेदवारांनीही सकाळीच मतदानाचा हक्क बजावला. ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले.

सोलापूर शहरातील ९ लाख २४ हजार ७०६ मतदारांपैकी निम्म्या मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. आज शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या निवडणुकीत विशेष लक्ष देत काही दिवस सोलापुरातच मुक्काम ठोकला होता. त्यांच्यासमवेत आमदार सचिन कल्याणशेट्टी, देवेंद्र कोठे यांनी शहरातील बहुतेक प्रभागात जाऊन सभा, रॅली काढल्या. विरोधकांनीही त्यांच्या पद्धतीने प्रचार केला. आता निकालाची उत्सुकता शिगेला पोचली असून कोणता उमेदवार पडणार आणि कोण जिंकणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तसेच शहरातील आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख व आमदार देवेंद्र कोठे यांच्या विधानसभा मतदारसंघातील किती जागा भाजप जिंकणार, याचीही उत्सुकता सर्वांना लागली आहे.

**सात ठिकाणी प्रभागनिहायनिकाल**

- सात निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात सात ठिकाणी मतमोजणी होणार
- सकाळी १० वाजता सुरवातीला पोस्टल मतमोजणी होईल
- सकाळी ११ वाजता प्रभागनिहाय मोजणीला प्रारंभ होणार आहे
- अ, ब, क, ड अशा चारही उमेदवारांची एकाचवेळी मतमोजणी होईल
- तीन फेऱ्यांमध्ये संपूर्ण १०२ जागांचा निकाल हाती येणार
- प्रत्येक फेरीसाठी किमान एक तासाचा अवधी लागेल
- दुपारी दोनपर्यंत निकाल स्पष्ट होणार

# सोलापूरमध्ये बालेकिल्ल्यातच भाजपाची गोची

## 1500 नागरिकांनी टाकला बहिष्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील 29 महानगरपालिकांसाठी गुरुवारी (15 जानेवारी) मतदान पार पडलं. मतदारांनी आपला हक्क बजवावा असं आवाहन सर्वांकडून सातत्यानं करण्यात येत होतं. पण सोलापूरमध्ये एक वेगळाच प्रकार घडला आहे. आपल्या मूलभूत प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा राग मनात धरून सोलापूरमधील तब्बल 1500 नागरिकांनी मतदानावर पूर्णपणे बहिष्कार टाकला.

**काय आहे कारण?**

सोलापूर महापालिकेच्या प्रभाग 26 मधील नागरिकांनी हा टोकाचा निर्णय घेतला आहे. रुबी नगर ते अवंती नगर या दरम्यानच्या रस्त्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. या परिसरातील चार सोसायट्यांमधील नागरिकांना मुख्य रस्त्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. विशेष म्हणजे 30 ते 35 वर्षांपूर्वी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात आला होता. मात्र आता हा रस्ता बंद करण्यात आला असून त्यामुळे दीड हजार लोकवस्तीला मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वारंवार मागणी करूनही महापालिका प्रशासन या प्रकरणात कोणताही ठोस हस्तक्षेप करत नसल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे.




**मोठ्या नेत्याचा प्लॉट अडथळा ! :** या रस्त्याच्या रखडण्यामागे एक राजकीय कारण असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित रस्त्याच्या मधोमध काँग्रेसच्या एका माजी आमदाराचा मोठा प्लॉट असल्याची चर्चा परिसरात आहे. या मोठ्या नेत्याच्या हितसंबंधांमुळेच हक्काचा रस्ता अडवला जात असल्याचा थेट आरोप नागरिकांनी केला आहे. रस्ता नसल्यामुळे दैनंदिन कामांसाठी नागरिकांना मोठी कसरत करावी लागते, मात्र राजकीय दबावापोटी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी याकडे डोळेझाक करत असल्याची भावना येथील रहिवाशांमध्ये निर्माण झाली आहे.

**भाजपाच्या बालेकिल्ल्यात उमेदवारांची पाठ**

प्रभाग 26 हा भाग भारतीय जनता पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. मात्र येथील संताप इतका मोठा आहे की, या चार कॉलनींमध्ये साधे मत मागण्यासाठी देखील कोणताही उमेदवार किंवा राजकीय पक्षाचा पदाधिकारी फिरकलेला नाही. मतदारांच्या रोषाला सामोरे जावे लागेल या भीतीने उमेदवार या भागाकडे फिरकले नसल्याचे बोलले जात आहे. मत मागण्यासाठी कोणी आले नाही आणि आमचा प्रश्नही सुटत नाही, मग मतदान कोणाला करायचे असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. या बहिष्काराच्या अस्त्रानंतर तरी महापालिका प्रशासन आणि लोकप्रतिनिधी या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावणार का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.



















## संपादकीय

# संशय दूर करायचा की वाढवायचा?

राज्य निवडणूक आयोगाने 'बोटावरील शाई पुसत नाही' असा खुलासा दिला असून शासनाकडून त्या खुलाशाची मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी केली जात आहे. मात्र, आरोपांचे गांभीर्य लक्षात घेतले असता केवळ खुलासा पुरेसा नाही, तर स्वतंत्र, निष्पक्ष आणि विश्वासार्ह चौकशी होणे अपेक्षित होते. दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.

लोकशाहीत निवडणूक प्रक्रिया ही केवळ कायदेशीर नसून विश्वासार्ह असणे अधिक महत्त्वाचे असते. शाई पुसली जात असल्याचे, ईव्हीएममध्ये घोळ असल्याचे, मतदान प्रक्रियेत अनियमितता होत असल्याचे आरोप सामान्य नसून ते थेट लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारे आहेत. अशा वेळी 'आम्ही सांगतो तेच खरं' अशी भूमिका घेण्याऐवजी, संशय दूर करणारी पारदर्शक चौकशी झाली असती, तर आयोगाची विश्वासार्हता अधिक बळकट झाली असती.

याऐवजी मुख्यमंत्री स्वतःच जणू न्यायाधीशाच्या भूमिकेत जाऊन विरोधकांवर आरोप करत असतील, तर प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचे होतात. सत्ताधाऱ्यांकडून आरोप आणि स्पष्टीकरण एकाच वेळी येणे म्हणजे संशयाला खतपाणी घालण्यासारखे आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणं हा गुन्हा नसतो; मात्र प्रश्न टाळणे, दुर्लक्ष करणे आणि उलट प्रश्न विचारणाऱ्यांवरच आरोप करणे, हेच अविश्वास वाढवते.

यामुळेच निवडणूक प्रक्रियेत ह्रासंगनमतह्न असल्याचा संशय नागरिकांच्या मनात निर्माण होतो. हा संशय केवळ शब्दांनी, प्रेस नोट्सनी किंवा राजकीय भाषणांनी दूर होणार नाही; तो फक्त स्वतंत्र चौकशी, स्पष्ट तथ्ये आणि ठोस कृतीनेच दूर होऊ शकतो.

यापूर्वीच्या निवडणूकांदरम्यान दोन एफआयआरद्वारे जवळपास १२ हजार बोगस आधारकार्ड्स आणि फोन नंबरच्या आधारे बनावट मतदार नोंदणीचे प्रयत्न झाल्याची गंभीर तक्रार दाखल झाली होती. त्या प्रकरणांचे पुढे काय झाले? तपास कुठपर्यंत पोहोचला? दोषींवर काय कारवाई झाली? या प्रश्नांची उत्तरे आजही मिळत नाहीत. हीच शांतता अनेक शंका निर्माण करते.

निवडणूक आयोग हे कोणत्याही सरकारचे प्रवक्ते नसून, लोकशाहीचे रक्षक असायला हवेत. आयोगाने 'आधीपासून असेच सुरू आहे' अशा भूमिकेऐवजी, प्रक्रियेतील त्रुटी मान्य करून त्यावर उपाययोजना केल्या, तरच लोकांचा विश्वास पुन्हा प्रस्थापित होईल. अन्यथा प्रत्येक निवडणूक ही संशयाच्या सावलीतच पार पडेल, आणि त्याचा सर्वात मोठा फटका लोकशाहीलाच बसेल.

आज गरज आहे ती आरोप-प्रत्यारोपांची नाही, तर पारदर्शकता, जबाबदारी आणि धाडसी चौकशीची. कारण लोकशाही ही केवळ मतदानाने नव्हे, तर त्या मतदानावर असलेल्या विश्वासाने टिकून असते.

# मतदान यंत्रे की संशय यंत्रणा?

सोलापूर, पुणे, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील अनेक शहरांमध्ये सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांमध्ये मतदानाच्या पहिल्याच टप्प्यात गंभीर आणि चिंताजनक बाबी समोर आल्या आहेत. लोकशाहीचा कणा असलेल्या मतदान प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या घटना केवळ तांत्रिक त्रुटी नाहीत, तर लोकशाहीवरील विश्वास डळमळीत करणाऱ्या आहेत.

कुठे मतदानाची सुरुवातच बंद ईव्हीएम मशीनने झाली, तर अनेक मतदान केंद्रांवर मशीनवरील वेळ प्रत्यक्ष वेळेपेक्षा १० ते १५ मिनिटे मागे असल्याचे दिसून आले. काही ठिकाणी मतदाराने तिसऱ्या उमेदवाराचे बटन दाबल्यानंतर दुसऱ्याच उमेदवाराची लाईट लागल्याची तक्रार आहे, तर काही मतदान केंद्रांवर शेवटचे (चौथे) बटन दाबल्यावर केवळ आवाज येतो, पण लाईट लागत नाही. या सगळ्या घटनांनी मतदारांमध्ये संभ्रम, संशय आणि अस्वस्थता निर्माण केली आहे.

ईव्हीएमवर मतदान करताना लाईट आणि आवाज हेच मतदारासाठी एकमेव खात्रीचे साधन असते. 'आपण दिलेले मत योग्य उमेदवारालाच गेले का?' हा प्रश्न जर मतदानाच्या क्षणीच मनात निर्माण होत असेल, तर ती निवडणूक प्रक्रिया मुक्त आणि निर्भय म्हणता येईल का? हा अत्यंत गंभीर प्रश्न आहे.

निवडणूक आयोग वारंवार ईव्हीएम सुरक्षित असल्याचा दावा करतो. मात्र प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशीच जर मशीन बंद, वेळ चुकीची, बटन-लाईटमध्ये विसंगती दिसत असेल, तर त्या दाव्यांवर विश्वास कसा ठेवायचा? या तांत्रिक त्रुटी आहेत की व्यवस्थात्मक निष्काळजीपणा, की यामागे आणखी काही आहे—हा संशय साहजिकच निर्माण होतो.

लोकशाहीत 'संशय' हाच सर्वात मोठा शत्रू असतो. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक नसेल, तर निकाल कितीही अधिकृत असला तरी त्यावर जनतेचा विश्वास बसत नाही. आज राज्यातील अनेक मतदारांच्या मनात हाच अविश्वास घर करत आहे, आणि तो लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक आहे.

निवडणूक आयोगाची जबाबदारी केवळ मतदान घेण्यापुरती मर्यादित नाही, तर प्रत्येक मत योग्य उमेदवारालाच गेले आहे, याची शंभर टक्के खात्री निर्माण करण्याची आहे. त्यासाठी तातडीने— ईव्हीएममधील तांत्रिक त्रुटींवर स्पष्ट आणि लेखी स्पष्टीकरण द्यावे,

संशयास्पद मशीन तत्काळ बदलाव्यात,

मतदान केंद्रांवर मतदारांना संपूर्ण समाधान मिळेल अशी प्रक्रिया राबवावी,

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मतदारांचा विश्वास पुनर्स्थापित करावा.

लोकशाही ही केवळ मतदानाने जिवंत राहत नाही, तर त्या मतदानावर असलेल्या विश्वासाने टिकून असते. तो विश्वास तुटला, तर निवडणुका केवळ एक औपचारिक कार्यक्रम ठरतात. आज राज्यात दिसणारा ईव्हीएम गोंधळ हा इशाराच देतो आहे.

निवडणूक आयोगाने हा इशारा गांभीर्याने घ्यावा, अन्यथा 'मतदान प्रक्रिया' आणि 'लोकशाही' या शब्दांमधील अंतर दिवसेंदिवस वाढत जाईल.

लोकशाही वाचवायची असेल, तर सर्वप्रथम मतदारांचा विश्वास वाचवावा लागेल.

# आनंदयात्री - श्रीकांत सदाशिव मोरे



आपल्या सभोवतालचा प्रत्येक माणूस हा चांगलाच असतो. तो त्याच्या परीने योग्य असतो. प्रत्येकजण आपापल्या विचाराने आपली जीवनशैली बनवतो. त्या शैलीने तो व्यक्तीगत पातळीवर समृद्ध होतो. मात्र या समृद्धीचा आनंद इतरांना देणारी माणसे ही फारच कमी असतात. ती अभावाने आढळतात. अशी माणसे मनस्वी असतात. आपली प्रत्येक कृती समाजातल्या प्रत्येक घटकाला आनंद देणारी असावी अशी त्यांची मनोवृत्ती असते. सुदैवाने अशा काही मोजक्या व्यक्तिमत्त्वांना मला जवळून पाहता आले. त्यांच्याशी मैत्री झाली. ऋणानुबंध जुळले. त्यापैकीच एक आनंदी चेहरा श्रीकांत सदाशिव मोरे. कवी, लेखक आणि सोलापूरच्या मनोरमा परिवाराचे मुख्य आधारस्तंभ, ही त्यांची राज्यातली ओळख आता सर्वदूर झाली आहे.

वारी आणि वारकरी संप्रदायाच्या संस्कारी तत्वज्ञानाला जीवन सर्वस्व मानणा- या स्व. सदाशिव मोरे आणि स्व. मनोरमा मोरे या दाम्पत्यांचा हा सुपुत्र. आईवडिलांच्या कडक शिस्तीत, उदार सहकारी विचार प्रणालीच्या संस्कार वातावरणानं त्यांना वाचन आणि लेखनाची आवड निर्माण झाली. माणूस जपताना, जाणून घेताना माणूसकीला प्राधान्य हवं या समाजभानाच बाळकडू लहानग्या श्रीकांतला आपल्या दूरदृष्टी असणाऱ्या तीर्थरुप आईवडिलांकडून मिळाले. प्राथमिक, माध्यमिक शाळेतल्या त्या उमलत्या दिवसात त्यांना वाचनाचे वेड लागले, लेखनाचे व्यसन जडल. वकृत्वाचा छंद लाभला. मराठी भाषेची अवीट गोडी त्यांना शालेय जीवनात लाभली. पुढे संगमेश्वरच्या महाविद्यालयीन दिवसात पुस्तकी अभ्यासाबरोबरीने कविता लेखन, ललित लेखनात ते व्यस्त राहिले. कविता म्हणजे शब्दांचा खेळ नसून तो अंतर्मनाचा प्रवित्र नाद आहे, याची जाणीव कवी श्रीकांतना त्यांच्या विद्यार्थीदशेत झाली. प्रसंगपरत्वे तरुण श्रीकांत काव्य निर्मितीच्या प्रांगणात मनोसक्त संचार करू लागला. प्रतिभावंतांच्या प्रतिभास्फूर्ती ला आणि व्यक्त सादरीकरणाला वेळ, काळ, स्थळ, याची मयार्दा नसते, त्याला श्रीकांतजी ही अपवाद नाहीत. त्यांच्या प्रतिभासंपन्न काव्यलेखन छंदातून त्यांचे आजपर्यंत तीस काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या आशयबद्ध कथालेखनातून मराठी कथा वाचकांना आजपर्यंत पाच कथासंग्रह भेटीला आले आहेत. त्यांच्या अष्टावधानी साहित्यिक व्यक्तिमत्वाला ललित लेखनाचा परिसस्पर्श झाला आणि यातूनच त्यांची ललित लेखनाची सहा पुस्तके मराठी रसिक वाचकांना आनंद देणारी ठरली. थोडक्यात कविता, ललित लेखन या साहित्य प्रवाहात कवी, कथाकार आणि लेखक श्रीकांत मोरेहे नाव मराठी साहित्य विश्वात लोकप्रियतेच्या शिखरावर आज विराजमान झालेले दिसते. अशा या मराठी वाङ्मयातील अष्टपैलू, अष्टावधानी श्रीकांत मोरेंची आणि माझी ओळख एका वर्तमानपत्रातल्या त्यांच्यावरच्या छोटेखानी लेखाने झाली.

साधारण वीस वषार्पूर्वी दैनिक लोकमतमधल्या व्यक्तिविशेष सदरात त्यांच्या उतुंग कार्यकर्तृत्वाची ओळख करून देणारा साहित्याबरोबर सहकार, विशेष करून आर्थिक क्षेत्रातील त्यातही सहकारी बँकिंग क्षेत्रातली त्यांची सर्वंकष कामे वाचनात आली. त्याच लेखात त्यांचे वास्तव, कार्यक्षेत्र आणि कर्मभूमी सोलापूर असा उल्लेख होता. सोलापूरचे माझे संपादक, पत्रकार मित्र श्री. राजाभाऊ माने यांना फोन केला. त्यांचा मोबाईल नंबर घेतला. श्रीकांत गोरे यांच्याशी बोलणे झाले. योगायोग असा की त्याच आठवड्यात मी मुंबई दूरदर्शन सह्याद्री वाहिनीच्या थेट प्रसारित होणाऱ्या महाचर्चा कार्यक्रमात त्यांना 'सहकार बँकिंग' या विषयावर चर्चा आयोजित केली होती. त्या कार्यक्रमात त्यांना सहकार बँकिंगमधील तज्ञ म्हणून निमंत्रित केले. त्या कार्यक्रमाच्या निमित्ताने वरळीच्या दूरदर्शन केंद्रात त्यांची प्रत्यक्ष भेट झाली आणि एका कलंदर अवलिया आनंदयात्रीचा जीवनपट उलगडून गेला.

सर्वसाधारण वारकरी, शेतकरी कुटुंबातील श्रीकांत मोरे महाविद्यालयीन जीवनातच कवी, कथाकार आणि लेखक म्हणून नावारुपाला आले. त्यांचे वडील स्व. श्री. सदाशिवराव मोरे यांनी सन १९९७ चेदरम्यान मनोरमा सहकारी बँकिंग विश्वाची मुहूर्तमेढ रोवली. मनोरमा पतसंस्थेची स्थापना केली. श्रीकांतजींनी आपल्या उमेदीच्या दिवसात नगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यात कोळपेवाडी येथेशिक्षकाची नोकरी केली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागात साहित्य विश्वातला हा तरुण मुंबईत लेखाधिकारी म्हणून रुजू झाला. सहकाराचा वसा आणि वारसा त्यांचे वडील स्व. सदाशिव मोरे यांच्याकडून त्यांना मिळाला. १९८९ साली ते सहकार खात्यात रुजू झाले. आपल्या प्रशासन कर्तृत्वावर राज्यशासनाच्या सहकार विभागात प्रथम श्रेणी अधिकारी या पदापर्यंत ते पोहोचले. सहायक उपनिबंधक या पदावर निष्ठेने आणि शिस्तीने कार्यरत राहिले. त्याच पदावर निवृत्त झाले. या नोकरी प्रवासात त्यांनी मनोरमा परिवाराची खऱ्या अथार्ने जोपासना केली. सहकारी बँकांची निर्मिती, शाखा विस्तार त्यांची विश्वासार्हता, बँकेचा व्यावसायिक दर्जा या साऱ्या गोष्टी त्यांनी लीलया पेलल्या. मनोरमा पतपेढीचा विस्तार काळाच्या ओघात आणि प्रगतीच्या वेगात अजाण वृक्षाप्रमाणे झाला. सहकाराची गंगोत्री असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातल्या सहकार समृद्धी असणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात आज मनोरमा बँक सहकारी बँकिंग क्षेत्रातली अग्रणी वित्त संस्था म्हणून लोकप्रिय ठरली आहे. याचे सारे श्रेय श्रीकांत सदाशिव मोरे यांच्यातल्या कुशल प्रशासकाला जाते.

त्यांची सखोल दूरदृष्टी राज्य राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा व्यासंगी निकोप, वित्तीय शिस्तीचा त्यांचा आग्रही विचार आणि सहकारी बँकेचा व चालविण्याची त्यांची उत्तम कुशलता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अमूल्य वैशिष्ट्ये आहेत. मनोरमा बँक समुहाच्या शाखा वाढवताना त्यांचे दर्जेदार अस्तित्व आणि आपल्या बँकेची व्यावसायिक विश्वासार्हता यावर त्यांचा पूर्ण कटाक्ष असतो. गरजूंना कर्ज पुरवठा करताना आवश्यक निकष आणि तरतुदींबद्दल ते प्रसंगी आग्रही असतात. बँकेची वित्त प्रतिष्ठा आणि पत जपण्यासाठी ते अहोरात्र कृतिशील राहतात, हे त्यांचे वेगळेपण आहे. तन-मन-धन या सर्व षड्रिपूंनी मनोरमा बँकिंग परिवाराचा आधारस्तंभ असणारे श्रीकांतजी समाजाचे आपण काही देणे लागतो या विचार सूत्राने कार्यरत आहेत. अनेक सेवाभावी उपक्रम त्यांच्या संकल्पनेतून सुरू झाले. गेल्या २५ ते ३० वर्षाच्या प्रदीर्घ वाटचालीत मनोरमाचे राज्याच्या अर्थव्यवस्थेत सहकारी बँकिंग क्षेत्रात नाव झाले. मनोरमा मल्टिस्टेटच्या आज जवळजवळ ७५ शाखा कार्यरत आहेत. मनोरमा बकँच्या साधारण ११ शाखांचा व्याप सोलापूर, पुणे जिल्ह्याच्या परिसरात वाढतोय. हा सर्व व्याप सांभाळताना त्यांना उत्तम जीवनसाथ लाभली आहे ती पत्नी सौ. शोभाताई मोरे यांची. पतीच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी एक आदर्श गृहिणी. एक समर्पित जीवनसाथी याचं आदर्श उदाहरण म्हणजे सौ. शोभा मोरे वहिनी. मनोरमा सखी मंचच्या त्या अध्यक्षा आहेत. सर्वात म्हणजे श्रीकांतजींच्या प्रत्येक कामात, त्यांच्या प्रत्येक कृतिपावलावर सौ. शोभा वहिनींची पत्नीपेक्षा मैत्रीची साथ आहे. म्हणूनच श्रीकांतजींची यशस्वी घोडदौड आज आपल्याला पाहायला मिळते.

मराठी भाषेविषयी जाज्वल्य प्रेम हा श्रीकांतजींचा स्वाभिमान आहे. समाजाप्रती परोपकाराची भावना ही त्यांची वृत्ती आहे. आज वयाच्या ६७ व्या वर्षीही दिवसातले १२-१२ १५-१५ तास काम करणेही त्यांची प्रवृत्ती आहे. समाजातल्या गुणीजनांचा विशेष करून प्रतिभावंत लेखक, साहित्यिकांचा गुणगौरव करणेहा त्यांचा साहित्यधर्म आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (म.सा.प.) माध्यमातून त्यांच्या संकल्पनेतून सोलापूर जिल्ह्यातल्या अनेक भागात म.सा.प.चे साहित्यिक जाळेविणलं गेलं. त्यांच्या अथक प्रयत्नातून अनेक मराठी साहित्यिक कार्यक्रम गेली २५ वर्षे अव्याहतपणे सुरू आहे. मनोरमा राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्कार समारंभ, मनोरमा जिल्ह्यास्तरीय विविध साहित्य संमेलने, पारंपारिक हुरडा पार्टीच्या जोडीने मातब्बर कवींची राज्यव्यापी कवी संमेलने, त्यांच्या कुशल संयोजनातून आतापर्यंत पार पाडली. त्यांच्या या साहित्य सेवेचा उत्तुंग कळस म्हणजे त्यांच्या संकल्पनेतून नुकतेच दि.२५/१२/२०२५ रोजी सोलापूर येथे झालेले मनोरमा राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन, दजेर्दार कवी संमेलन, विचार प्रवण चर्चासत्र परिसंवाद, विविध साहित्यिक उपक्रमांची, सत्रांची रेलचेल, मराठी रसिकांची लक्षणीय उपस्थित्ती, त्यांचेस्वतःचे संमेलन अध्यक्ष म्हणून झालेलेचिंतनीय भाषण आणि या संमेलनाचे उद्घाटक यंदाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कादंबरीकार विश्वास पाटील यांचं वर्तमान मराठी भाषेच्या सद्यस्थितीचा वेध घेणारं चिंतनशील भाषण या बहुरंगी संमेलन वैशिष्ट्याने सोलापुरातले पंचतारांकित हॉटेलमध्ये झालेलेहे संमेलन स्मरणीय ठरले. ऐतिहासिक ठरले. मनोरमाच्या प्रत्येक सदस्याने या संमेलनात केलेले संयोजन कार्य हे लक्षणीय ठरले. मायमराठीचा हा साहित्य सोहळा पंचतारांकित हॉटेलच्या शाही वातावरणात नामवंत साहित्यिकांच्या उपस्थितीत झाला. त्याला पारंपरिक हुरडा पाटीर्ची दिलेली जोड हा एक अपूर्व योग होता. खऱ्या अथार्ने मराठी संमेलन विश्वातलंहे संपन्न झालेले संमेलन हे मराठी संमेलन विश्वातलं एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरलं.

रसिकहो श्रीकांतजींचा लोकसंग्रह दांडगा आहे. लोकसंग्रह अफाट आहे. साहित्य आणि सहकार बँकिंगमधल्या सर्वच क्षेत्रात त्यांचं वागण, चालणं, बोलणं सहज सुंदर आहे. अनुकरणीय आहे. वादविवादांपासून ते अलिप्त आहे. जीवनावर निरतिशय प्रेम करणारी आणि दुसऱ्यांना प्रेमाचा, स्नेहाचा, मैत्रीचा आणि परोपकाराचा आनंद देणारी काही अपवादात्मक माणसं, व्यक्ती मला माझ्या आजपर्यंतच्या आयुष्य मुशाफिरीत भेटली. त्यांच्याशी मैत्रीचे ऋणानुबंध जुळले. त्यापैकी श्रीकांतजी हे एक आहेत. मैत्री आणि व्यवहार या दोन समांतर रेषा आहेत. हे जीवन सूत्र प्रामाणिकपणे जगताना मला उमजलेले समजलेले मित्र श्रीकांत सदाशिव मोरेहे खऱ्या अथार्ने प्रतिभावंत साहित्यिक आणि अष्टपैलू अर्थतज्ञ आहेत. सर्वात म्हणजे ते अजातशत्रू आहेत. आपल्या रोजच्या धावपळीच्या आयुष्यात छोट्याछोट्या गोष्टीत ते आनंद घेतात. विशेष म्हणजे मनोरगा बँक परिवाराच्या हजारो कोटींची आर्थिक उलाढालीत बँकेचे चेअरमन म्हणून लीलया सारथ्य करणाऱ्या श्रीकांतजींचे पाय मातीत मिसळलेले आहे. बँकेच्या कोट्यवधी रुपयांच्या व्यवहारांचा आणि ठेवींचा हा पालनकर्ता मनोरमा बँक समूहाचा हा चेअरमन अगदी सहजतेने सोलापूर शहरातल्या आपल्या नेहमीच्या भेळपुरीच्या गाडीवर तुमच्या आमच्याप्रमाणे आजही पाणीपुरीचा आस्वाद घेतो, हे मी प्रत्यक्ष अनुभवलयं, पाहिलयं. नुकत्याच सोलापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय संमेलनात त्यांची प्रकट मुलाखत मी घेताना त्यांच्याबद्दल बोलताना कविवर्य सुरेश भटांच्या ओळींचा दाखला दिला होता

'रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा, गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा' ख-या अर्थाने श्रीकांतजी हे आनंदाचे रांजण आहे. त्यांचा मुलगा सुमित, मुलगी ऋचा आणि जावई आदित्य हे त्यांचे आदर्श उत्तराधिकारी आहेत. अनेक हातांना काम देणारे, रोजगार देणारे, राज्याच्या सहकार बँकिंग क्षेत्रामध्ये नवा इतिहास घडविणारे, मराठी साहित्याचा वसा आणि वारसा आपल्या प्रतिभेने जोपासणारे श्रीकांत सदाशिव मोरे खऱ्या अथार्ने आनंदयात्री आहेत. अशा या आनंदयात्री श्रीकांत मोरेंना माझ्या लक्षावधी हार्दिक शुभेच्छा !

**- मा. जयू भाटकर**
सदस्य, महाराष्ट्र राज्य
मराठी साहित्य संस्कृती मंडळ
मो. ९८६९५६७८७७

# लोकइच्छेचा स्वीकार करा!

आज महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा निकाल लागणार आहे. मागील एक महिन्यापासून सुरू असलेल्या या प्रचाराच्या रणधुमाळीत उमेदवारांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांची सरबत्ती करत चिखलफेक केली. भ्रष्टाचार, निष्क्रियता, गैरव्यवहार, कलंकित चारित्र्य अशा विविध आरोपांमुळे उमेदवारांची मने क्षुब्ध झाली होती.

मकर संक्रांतीच्या आदल्या दिवशी प्रचार संपला आणि दुसऱ्या दिवशी 'तिळगुळ घ्या आणि गोड बोला' म्हणत प्रचारातील कडवटपणाही संपला. मतदानाच्या आदल्या दिवशी काही ठिकाणी मतदारांना प्रलोभन दाखवण्याचे प्रयत्न झाले. 'लक्ष्मी दर्शन' झाल्यामुळे काही मतदार देखील सुखावले.

आज मतमोजणी होऊन प्रत्येक प्रभागामध्ये पुढील पाच वर्षांसाठीचे कारभारी निश्चित होतील. जिंकणाऱ्या उमेदवारांनी उन्माद न करता जनता-जनार्दनाचे आभार मानले पाहिजेत. पराजित उमेदवारांनी लोकइच्छेचा स्वीकार करायला हवा.आपण लोकांपर्यंत पोहोचू शकलो नाही, आपला विकासाचा संकल्प स्पष्ट सांगता आला नाही, विरोधकांनी खोटा प्रचार केला किंवा साम-दाम-दंड-भेदाचा वापर केला — कोणतेही कारण असले तरी पराभवातून आत्मचिंतन केले पाहिजे.विजयी उमेदवारांनी आता जनतेला दिलेली सर्व वचने समोर ठेवून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी. प्रभागातील पाणी, स्ट्रीटलाईट, रस्ते, कचरा, गटार व्यवस्था — या मूलभूत सुविधांकडे प्राधान्याने लक्ष द्यावे. महानगरपालिकेच्या वार्षिक अर्थसंकल्पातून प्रभागासाठी आवश्यक निधी आणावा. शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना द्यावी आणि पात्र लाभार्थ्यांना त्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून द्यावा.


नवनियुक्त नगरसेवकांनी प्रभागातील नागरिकांशी सतत संपर्कात राहून विकासकामांना गती द्यावी. प्रभागात सीसीटीव्ही कॅमेरे, मुलांसाठी खेळांची मैदाने व बालोद्यानांची उभारणी, पाणीपुरवठ्याची शाश्वत सोय आणि शहराच्या स्वच्छतेसाठी उपयोजना याकडे विशेष लक्ष द्यावे. महानगरपालिकेच्या बैठकींना हजेरी लावून प्रश्न विचारणे, सूचना करणे आणि निर्णय प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निवडून आलेल्या नगरसेवकांनी भविष्यात आपल्याला आमदार,खासदार होऊन महाराष्ट्राचे आणि देशाचे नेतृत्व करायचे आहे अशी महत्वाकांक्षा ठेवून पारदर्शकपणे, तत्परतेने आणि सर्व घटकांना सोबत घेऊन कामे केली पाहिजेत. प्रभागाच्या ज्या भागातून आपल्याला कमी मतदान मिळाले त्या भागाकडे दुर्लक्ष न करता पुढील काळात तेथील लोकांचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रभागातील महानगरपालिका तसेच खाजगी सर्व शाळांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे लक्ष दिले पाहिजे. झोपडपट्टी भागातील शाळांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांची गळती कमी करण्याकडे तेथील शिक्षकांच्या मदतीने एखादा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. झोपडपट्टी भागातील तरुणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे तेथील गुन्हेगारी, दारिद्र्य आणि बकालपणा वाढलेला आहे. तरुणांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी जनजागृती पर कार्यक्रम घेऊन प्रत्यक्ष या तरुणांना भेटून त्यांचे समुपदेशन करण्याकडे भर दिला पाहिजे. "माझा प्रभाग माझे घर " ही संकल्पना आता नवनियुक्त नगरसेवकांनी आपल्या कृतीत आणली पाहिजे. कोविड सारख्या आपत्ती काळामध्ये जास्तीत जास्त लोकांना मदतीचा हात दिला पाहिजे. या सर्व महानगरपालिकेत निम्म्या संख्येने महिला नगरसेविका नियुक्त होऊन येणार आहेत. या सर्व महिला नगरसेविकांनी खऱ्या अथार्ने महिलांचे प्रतिनिधित्व केले पाहिजे. रबरी शिक्का होऊन न राहता प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव घेतला पाहिजे. प्रभागातील महिलांचे सक्षमीकरण होण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचवला पाहिजे.

पराजित उमेदवारांनी देखील पराभव स्विकारून प्रभागातील विरोधी पक्षाची जबाबदारी पार पाडली पाहिजे. नगरसेवकाच्या कामावर लक्ष ठेवून आवश्यक तेथे सूचना करणे आणि अयोग्य कार्याविरुद्ध आवाज उठवणे हीसुद्धा लोकसेवाच आहे याची जाणीव ठेवली पाहिजे. पराभवाने खचून न जाता पुढील पंचवार्षिक निवडणुकीची तयारी उद्याच्याच दिवसापासून सुरू केली पाहिजे. निवडणुका संपल्या म्हणजे राजकारण संपले — आता दोघांनीही विकास आणि समाजकारण याला प्राधान्य द्यावे. कोणतीही कटुता मनात न ठेवता पराजित उमेदवाराने दिलदार मनाने पराभव स्वीकारणे हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे.

लोकशाहीमध्ये जनता हीच जनार्दन असते.

जनकौल हा अंतिम असतो.म्हणूनच, आता निकाल काहीही असो—जिंकणाऱ्यांनी नम्रतेने कामाला लागावे आणि हरणाऱ्यांनी धैर्याने पुढचा प्रवास सुरू करावा.

कारण शेवटी, प्रभागाचा आणि शहराचा विकास हीच सर्वांची समान जबाबदारी आहे.



**किशोर जाधव**
सोलापूर
- मो. नं. ९९२२८८२५४१

पान १ वरून

## सोलापूरात निवडणूक अधिकाऱ्यानेच...

करून घेतले आहे. प्रशासनाकडून सत्ताधाऱ्यांच्या दडपशाहीला खतपाणी घातले जाते आहे. मतदारांच्या लोकशाहीतील मतदानाचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. प्रशासनाला हाताशी धरून असे प्रकार होणार असतील, तर आम्ही मतदानावर बहिष्कारच घालू, असा इशाराही मतदारांनी दिला आहे.

शहरातल्या अनेक ठिकाणी मशिन बंद पडत आहेत. मीठ गल्ली येथील शिवानुभव मंगल कार्यालयातील मशीन बंद पडले होते. शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील जुन्या एम्लॉयमेंट परिसरात डेमो ईव्हीएम बाळगणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. शिवदारे कॉलेज येथे ईव्हीएम मशीनही बंद पडले होते. प्रभाग आठमध्ये दीड तास मतदान बंद पडले होते. प्रभाग 3 मधील 5 नंबर मशीन बंद पडली होती.

दरम्यान, प्रभाग २६ मध्ये उमेदवारांच्या आरक्षणाचे प्रवर्ग मतदान यंत्रांवर बदल करण्यात आल्याने उमेदवारांमधून तीव्र संताप केला आहे. प्रभाग क्रमांक १० मध्ये एक महिला मतदानासाठी गेली असता तिला मतदान यंत्रातील इच्छित बटन दाबले जात नव्हते. त्याची तक्रार केल्यानंतर संबंधित केंद्रावरील मतदान अधिकाऱ्याने भाजपच्या चिन्हासमोरचे बटन दाबल्याचे उघड झाले आहे.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती...

अनामत रक्कम, मतमोजणी आदर्श आचार संहितेचे पालन करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. 8 जिल्हा परिषद गटासाठी 8 कर्मचारी तर 16 पंचायत समिती गणासाठी 16 कर्मचारी फॉर्म तपासणीसाठी नियुक्त करण्यांत आले आहेत. तसेच आचारसंहिता कक्ष तयार करण्यात आला असून यामध्ये गटविकास अधिकारी त्यांचे नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. हे आचार संहिता कक्ष पंचायत समिती, शेतकी भवन येथे असणार आहे. या कक्षात एक खिडकी कक्ष असणार असून येथे प्रचार संबधित सर्व परवानग्या दिल्या जाणार आहेत. तसेच एफएसटी, एसएसटी, व्हिएसटी पथकाव्दारे आचारसंहिता नियंत्रण केले जाणार असल्याचे सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगीतले.

निवडणूक कार्यक्रमाची सुचना प्रसिध्द करण्याचा दि.16 जानेवारी, नामनिर्देशन पत्र भरण्याचा कालावधी दि. 16 ते 21, नामनिर्देशनपत्र छाणनी दि.22 रोजी तर याच दिवशी यादी प्रसिध्द होणार, दि. 23 ते 27 उमेदवारी अर्ज माघार, दि. 27 रोजी अंतिम उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप, मतदान दि. 5 फेब्रुवारी रोजी सकाळी 7.30 ते 5.30 वा. पर्यंत, मतमोजणी दि. 7 रोजी करण्यात येणार आहे.

**फटका**

### घाईची शाई

किती उत्साह होता
पण हुरूप मावळला...
शाई गेली पुसून आणि
तिथेच घोळ झाला...
आयोगाच्या आईचा घो
म्हणत कोणी केला कल्ला...
इथेही गालबोट लागले,आणि
पुन्हा ईव्हिएम वर झाला हल्ला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पुण्यात गावाकडनं आणले मतदार, सोलापुरात कर्नाटकातून गाड्या भरल्या : बोगस मतदारांचा सुळसुळाट

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील 29 महापालिकांसाठी महानगरांमध्ये मतदानाला सकाळपासूनच सुरुवात झाली आहे. मात्र, बोगस मतदान, मतदान यंत्रातील बिघाड, बोटावरील शाई पुसणे, दुसऱ्याच व्यक्तीने मतदान करुन जाणे यांसह अनेक गैरप्रकार समोर येत आहेत. त्यावरुन, आता विरोधी पक्षातील नेत्यांनी ओरड सुरू केली असून स्थानिक मतदान केंद्रावरील लोकही व्हिडिओच्या माध्यमातून भूमिका मांडत आहेत. त्यातच, पुणे, सोलापूर, मुंबई आणि जालन्यासह काही ठिकाणी बोगस मतदार पकडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सोलापुरातकर्नाटकमधून गाड्या भरुन मतदार आणल्याचा दावा समाजवादी पक्षाकडून करण्यात आला आहे.




पुण्यातील प्रभाग क्रमांक 41 चे उमेदवार प्रमोद नाना भानगिरे यांनी स्वतः महादेव वाडी उंड्री या परिसरात एका खासगी गाडीतून ग्रामीण भागातून काही लोकांना मतदानासाठी आणण्यात आल्याचा आरोप केला आहे. नाना भानगिरे हे शिवसेना पुणेशहरप्रमुख आहेत, त्यांनी स्वतः प्रभाग क्रमांक 41 महादेववाडीउंड्री या प्रभागातील उंड्री चौक येथे बोगस मतदान पकडले आहे आहेत. तसेच, संबंधितांवरपोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केलीय.

### बोरिवलीत भगवा गार्डने पकडले बोगस वोटरआयडी

बोरिवली प्रभाग क्रमांक 10 मध्ये भगवा गार्ड यांनी फेक वोटरआयडी पकडले आहेत. भाजपकडून फेक वोटरआयडी वाटले जाऊन मतदानासाठी लोकांना आणले जात आहे, त्याशिवाय भाजपकडूनवोटिंगस्लिप दिल्या जात आहेत असा आरोप भगवा गार्ड यांच्याकडून करण्यात आला. त्यावर मतदान केंद्रावर आक्षेप घेण्यात आला आणि त्यानंतर स्थानिक आमदार मनीषा चौधरी त्यासोबतच भाजप पदाधिकारी यांच्यासोबत गोंधळ झाल्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

### जालन्यात बोगस मतदार ताब्यात

जालन्यातील प्रभाग क्रमांक ९ मधील डबल जिन परिसरामध्ये एका मतदाराने बोगस मतदान केल्याचा संशय मतदान प्रतिनिधींनी केला आहे. या संशयावरून संबंधित मतदाराला पोलिसांनी ताब्यात घेतलं. संशयित मतदाराची सध्या पोलिसांकडून विचारपूस केली जात आहे, खात्री झाल्यानंतर पुढील कारवाई करणार असल्याचं पोलिसांचीसांगितल. संशयित मतदाराने दुसऱ्या नावावर मतदान केल्याचा आरोप मतदान प्रतिनिधींनी केला असून मधुकर देठे असं पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयित मतदाराचे नाव आहे.

दरम्यान संशयित मतदाराने कोणत्या नावाने मतदान केलं आहे, याची खात्री संबंधित निवडणूक अधिकाऱ्याकडून घेत असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिली आहे.

### कर्नाटकातून गाड्या भरुन आणले मतदार

सोलापुरातील प्रभाग 14 मध्ये एमआयएम आणि समाजवादी पक्षात वाद झाल्याचं पाहायला मिळालं. एमआयएमकडून बोगस मतदानासाठी कर्नाटकातून गाड्या आणल्याचा आरोप समाजवादी पक्षाकडून करण्यात आला आहे. जवळपास दोन हजार मतदार बोगस मतदानासाठी आणल्याचा आरोप समाजवादीकडून करण्यात आला.

मात्र, हे बोगस मतदार समाजवादी पक्षाकडून पकडल्यानंतर बोगस मतदार माफी मागून निघून गेल्याचा दावाही समाजवादीचे उमेदवार रियाज खरादी यांनी केला आहे.

### भांडुपमध्ये गोंधळ

मुंबईच्या भांडुपमधील आदर्श नगर प्रभाग क्रमांक 114 मध्ये शिंदे शिवसेना आणि ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदान केंद्रावर समोरासमोर आल्याचं पाहायला मिळालं. त्यांच्यात बाचाबाची झाली आणि गोंधळ उडाला, त्यानंतर आता पोलिसांकडून वातावरण शांत करण्यात आले.

# महिलांना लखपती करण्यासाठी कर्ज पुरवठा करा- सीईओ जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील महिला बचत समूहातील महिलांना लखपती करण्यासाठी बँकांनी त्यांच्या वैयक्तिक व्यवसायाला कर्ज पुरवठा करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले. उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत जिल्हास्तरीय बँकर्स प्रशिक्षण कार्यशाळेत मार्गदर्शन करताना सीईओ जंगम बोलत होते. यावेळी जिल्हा



ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, मन्सूर पटेल, शुभांगी देशपांडे, खंडेराव दीक्षित, दयानंद सरवळे, संतोष डोंबे, राहुल जाधव, मीनाक्षी मडवळी, शीतल म्हंता उपस्थित होते.

सीईओ जंगम म्हणाले, ग्रामीण भागातील महिला या उमेद अभियानातून व बँकेच्या माध्यमातून दिले जाणारे अर्थसहाय्य हे त्यांच्या उद्योग उभारणीसाठीच वापर करत आहेत. बचत गटाच्या महिलांनी कजार्ची रक्कम वेळेवर परतफेड करत असल्याने बँकांनी बचत गटांबरोबरच वैयक्तिक व्यवसायाला कर्ज देऊन लखपती दीदी करण्यासाठी सहकार्य करावे.

### बँकांनी पुढाकार घ्यावा

उमेद अभियानामुळे महिला स्वावलंबी झालेल्या आहेत. व्यवसायाच्या माध्यमातून आपल्या कुटुंबांना आर्थिक सक्षम केले आहेत. छोट्या व्यवसायाबरोबरच महिला शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून शेतमाल परदेशात निर्यात करत आहेत. भविष्यात मोठे व्यवसाय करण्यासाठी बँकांनी कर्ज पुरवठा करून महिलांना सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रकल्प संचालक चंद्रशेखर जगताप यांनी केले.

# पैसे वाटप करीत असल्याच्या आरोपावरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मतदारांना पैसे वाटप करीत असल्याच्या आरोपावरून दोघांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रेम नागेश गायकवाड आणि मोहित गुरुदत्त गायकवाड (दोघे, रा. सेटलमेंट, सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याबाबत भरारी पथकाचे अधिकारी स्वप्निल राजेंद्र माळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २२ मध्ये भाजपकडून निवडणूक रिंगणात असलेल्या अंबिका नागेश गायकवाड यांचा मुलगा प्रेम नागेश गायकवाड आणि त्याचा साथीदार मोहित गुरुदत्त गायकवाड या दोघांना काँग्रेसचे उमेदवार कुणाल गायकवाड यांनी मोदी परिसरातील सोनी नगर भागातील हुडको कॉलनी येथे पैसे वाटप करीत असताना बुधवारी दुपारी रंगेहात पकडले.याबाबत कुणाल गायकवाड यांनी निवडणूक यंत्रणेला मतदारांना पैशाचे आम्हीच दाखवून प्रभावित करण्यात येत असल्याची तक्रार केली व याबाबतचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यानंतर भरारी पथकाचे अधिकारी माळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सदर बझार पोलीस ठाण्यात बुधवारी रात्री प्रेम गायकवाड व मोहित गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास सदर बझार पोलीस करीत आहेत.

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं / २०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

पृथ्वीराज मधुकर शेंडेकर
रा.वडदेगाव ता.मोहोळ जि. सोलापूर }**अर्जदार**
**विरूद्ध**
ग्रापंचायत वडदेगाव ता. मोहोळ }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची आई रमल पृथ्वीराज शेंडेकर मृत्यू दि.६/९/२०१८ रोजी वडदेगाव ता.मोहोळ.जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे रमल पृथ्वीराज शेंडेकर यांच्या मृत्यू बाबत सामनेवाला यांच्याकडे मृत्यू दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेबर २०१८ चे आभिलेखात अर्जदार याची मृत्यूनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात मृत्यूनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.३१/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे मृत्यू दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. १६/१/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

# १०३ व्या वर्षीही शिवलाल स्वामींनी बजावला मतदानाचा हक्क



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये उत्साह दिसून येत असताना, श्री सद्गुरू श्री शिवलाल स्वामी यांनी वयाच्या १०३ व्या वर्षी प्रभाग क्रमांक २३ मध्ये जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावून सर्वांसमोर प्रेरणादायी आदर्श ठेवला.

लोकशाहीप्रती असलेली निष्ठा आणि कर्तव्यभावना यांचे उत्तम उदाहरण स्वामींनी घालून दिले. मतदान केंद्रावर शांत, संयमी आणि आत्मविश्वासपूर्ण उपस्थितीमुळे तेथे उपस्थित नागरिकांमध्ये विशेष उत्साह संचारला. या वेळी त्यांच्यासोबत त्यांचे शिष्य सुधीर बहिरवाडे आणि रवि तमायचे उपस्थित होते. दोघांनीही स्वामींना मतदान केंद्रापर्यंत साथ देत त्यांचा सन्मान आणि सेवा भाव व्यक्त केला.

ज्येष्ठ नागरिकांनी मतदानात सहभागी व्हावे, असा प्रेरणादायी संदेश श्री शिवलाल स्वामी यांच्या या कृतीतून संपूर्ण समाजाला मिळाला आहे.

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं / २०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

रेशमा बक्षु शेख
वय -४८ वर्षे. धंदा- गृहिणी
रा. विटा ता. खानापूर जि. सांगली }**अर्जदार**
**विरूद्ध**
मोहोळ नगरपरिषद मोहोळ }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा रेशमा बक्षु शेख जन्म दि. २१/२/१९७७ रोजी मोहोळ ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार रेशमा बक्षु शेख यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे फेब्रुवारी१९७७ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.३१/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे. ता. १६/१/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं / २०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

मौलाली करीम मुजावर
रा.कामती बु ता.मोहोळ जि. सोलापूर }**अर्जदार**
**विरूद्ध**
ग्रापंचायत कामती बु ता. मोहोळ }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांच्या मौलाली करीम मुजावर जन्म दि. १०/५/१९८० व मुलगा सोहेल मौलाली मुजावर जन्म दि.२६/११/२००६ रोजी कामती बुद्रुक ता. मोहोळ जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे मौलाली करीम मुजावरव मुलगा सोहेल मौलाली मुजावर यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमुद तारखे 'नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे मे १९८० व नोहेंबर २००६ चे आभिलेखात अर्जदार याची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि.३१/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. १६/१/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं / २०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

शकीलाबानु बाबूलाल शेख
रा. सोलापूर जि. सोलापूर }**अर्जदार**
**विरूद्ध**
ग्रापंचायत मिरी ता. मोहोळ }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांच्या शकीलाबानु बाबूलाल शेख जन्म दि. ९/८/१९७५ रोजी देगाव (वा) ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्या कडे शकीलाबानु बाबूलाल शेख यांच्या जन्मा बाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे ऑगस्ट १९७५ चे आभिलेखात अर्जदार याची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्मनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.३१/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. १६/१/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण अर्ज नं / २०२५

**मोहोळ येथील मे. तहसिलदार साहेब यांचे समोर**

कीर्ती विशाल जोशी
वय -३१ वर्षे. धंदा- नोकरी
रा.उदगीर जि. लातूर }**अर्जदार**
**विरूद्ध**
मोहोळ नगरपरिषद मोहोळ }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांचा मुलगा सार्थक विशाल जोशी जन्म दि.३०/६/२०१९ रोजी मोहोळ ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचा मुलगा सार्थक विशाल जोशी यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्याकडे जन्म दाखल्याची तारीख वरील नमुद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे जून २०१९ चे आभिलेखात अर्जदार यांची जन्मनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात जन्माची नोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.३१/१/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे.ता. १५/१/२०२६

**लिपीक** (शिक्का) **हुकूमावरुन तहसीलदार मोहोळ सोलापूर**

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक २०२६च्या तयारीचा आढावा

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दि. १३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्यानंतर त्यानुषंगाने निवडणूक तयारीला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर आज दि. १५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी



३.०० वाजता निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात (तहसील कार्यालय, बार्शी) सर्व नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीत निवडणूक प्रक्रियेशी संबंधित विविध जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या नोडल अधिकारी व त्यांच्या सहाय्यकांना त्यांच्या कामकाजाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

निवडणूक प्रक्रियेतील नियोजन, समन्वय, वेळापत्रक तसेच कायदेशीर व प्रशासकीय बाबींवर भर देत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

निवडणुका शांततेत, पारदर्शक व नियमानुसार पार पडाव्यात यासाठी सर्व नोडल अधिकारी यांनी जबाबदारीने कार्य करावे, असे निर्देश यावेळी देण्यात आले.

बैठकीस सर्व नोडल अधिकारी व त्यांचे सहाय्यक उपस्थित होते.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

**वाचकांसाठी निवेदन**: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# भाजप सत्तेसाठी हपापलेले, विकास हाच आमचा मुद्दा - खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिका निवडणूक-२०२६ अंतर्गत दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) सोलापूर येथील मतदान केंद्र क्रमांक ०५ येथे माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, ज्येष्ठ नेत्या उज्वलाताई शिंदे आणि खासदार प्रणिती शिंदे यांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.



यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना खासदार प्रणिती शिंदे यांनी सत्ताधारी भाजपवर जोरदार टीका केली. त्या म्हणाल्या की, भाजप सत्तेसाठी हपापलेला असून कोणत्याही पातळीवर जाऊन ही निवडणूक लढवत आहे, हे लोकशाहीसाठी, महाराष्ट्रासाठी आणि सोलापूरसाठी घातक आहे.

नऊ वर्षांनंतर सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक होत असून, महाविकास आघाडी विकासाचा नवा दृष्टिकोन, नवी उमेद आणि नवी संकल्पना घेऊन जनतेसमोर गेली आहे. नागरिकांनी जात-पात-धर्म बाजूला ठेवून, मागील सत्तेचा इतिहास पाहून विकासालाच मतदान करावे, असे आवाहन त्यांनी केले.

गेल्या पंधरा दिवसांपासून शहरात दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले असून मारहाण, धमक्या, दबाव तंत्राचा वापर सुरू आहे, हे अत्यंत दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले. भाजप कार्यकर्त्यांकडून काँग्रेस कार्यकर्त्यांना मारहाण, युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचे प्रकार पोलीसांसमोर घडत असल्याचा आरोप त्यांनी केला. काही ठिकाणी पालकमंत्री स्वतः पैसे वाटप करत असल्याचा गंभीर दावा त्यांनी केला.


आज अनेक मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीन बंद पडल्याच्या तक्रारी, तसेच काही ठिकाणी हाताच्या चिन्हाचे बटण कार्यरत नसल्याचे प्रकार समोर आले आहेत. अनेक प्रभागांमध्ये दहशत निर्माण करून मतदारांवर दबाव टाकला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भाजपचा जाहीरनामा पूर्णपणे अपयशी ठरला असून पाणीपुरवठा, रस्ते, भ्रष्टाचार या कोणत्याही मुद्द्यांवर ते अपयशी ठरले आहेत, त्यामुळे भाजपविरोधात जनतेत तीव्र रोष असल्याचे त्या म्हणाल्या. उमेदवार पळविण्याचे प्रकार यापूर्वी कधीही घडले नसून, सत्ता नव्याने मिळाल्यामुळे भाजपच्या काही नेत्यांच्या डोक्यात सत्ता गेली आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतूनच सत्ताधाऱ्यांचा अहंकार उतरतो आणि जनता त्यांना त्यांची जागा दाखवून देते, असे सांगत खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सोलापूरला संयमी, विकासाभिमुख नेतृत्वाची गरज आहे. महाविकास आघाडी ही लढाई लोकशाही, संविधान आणि सोलापूरच्या विकासासाठी लढत असून, सोलापूरची जनता नक्कीच विकासाच्या बाजूने कौल देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

तसेच, सामझ्रदामझ्र दंडझ्रभेद आणि प्रशासनाच्या गैरवापरातून भाजप निवडणूक लढवत असल्याचा आरोप करत त्यांनी पोलिसांना निष्पक्षपणे काम करून निवडणूक शांततेत व पारदर्शकपणे पार पाडण्याची मागणी केली.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) डोळे, नयन
२) काव्य, कविता
३) भाजप पक्षाचे नाव पूर्ण लिहा
४) सीतापती ५) वेळ वाया न घालवता, पटकन ६) न भिणारा ७) श्वास घेण्याचे इंद्रिय १०) नस उलट लिहा
१२) पाय १५) स्वस्तच्या विरूध्दार्थी
१७) समुद्राच्या पाण्याची चव
१८) बसपाचे निवडणूक चिन्ह
१९) वभ उलट लिहा
२०) जंगलातील प्राण्यांचा राजा
२१) स्वभावाने रागीट २४) शपथ (हिंदीत) २५) दमयंती पती २६) आईची बहीण २८) भाकरी थापण्याची मोठी थाळी ३०) भारताच्या उत्तरेकडील उत्तुंग पर्वत
३१) कामातून मिळालेला मोकळा वेळ
३२) अस्वलांचे खेळ दाखविणारा
३५) जुनाच्या विरूध्दार्थी
३६) दहा आणि सात मिळून होणारी संख्या
३७) लोखंडी आकडा, हुक
३९) शहर
४१) मास, महिना
४२) एक हिंदी न्यूज चॅनल-** तक
४३) एक म्हण-** घर पोकळ वासा

**आडवे शब्द :** १) संसदेचे एक सभागृह
४) भारत जोडो यात्रा काढणारे राष्ट्रीय काँग्रेसचे मुख्य नेते
८) स्वाद, रूची ९) पध्दत (हिंदीत)
११) सततची केलेली मागणी, तगादा १३) ख्रिश्चन धर्मसेविका
१४) दोन आणि एक मिळून होणारी संख्या
१५) राशीचक्रातील एक रास १६) फुलांची माळ, पराभव
१७) एक म्हण-** तशी माती
१८) भारतीय निवृत्त फिरकी गोलंदाज
२१) धातूचा बारीक तंतू २२) जंगल, अरण्य
२३) लगेच, तातडीने २७) दह्यात पाणी मिसळून घुसळलेले पेय
२८) सूर्योदयापूर्वीचा उषःकाल २९) मनाला टोचणी लावणारे शल्य
३०) डासांमुळे थंडी वाजून येणारा ताप ३१) रास उलट लिहा
३२) संयम, धमकी देणे, धाप लागणे ३३) मक्षिका ३४) वतनाचा मालक
३७) दुर्ग, किल्ला ३८) बैलाच्या नाकात घातलेली दोरी
४०) महाराष्ट्रातील एक जिल्हा ४३) कपाची जोडीदार ४४) मार्ग, रस्ता (हिंदीत)
४५) राजाचे निवासस्थान ४६) बे दुणे

## सुडोकु - 153

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 2 | | | 5 | | | 6 |
| 1 | 9 | 7 | | | | | 4 | |
| 5 | 6 | | 4 | | | 1 | | 9 |
| 8 | | 1 | 3 | | | 2 | 6 | |
| 9 | | | | 7 | 1 | 4 | 5 | |
| | | 3 | 2 | 5 | 6 | | | |
| | | 5 | | 3 | 2 | 7 | | |
| | | 4 | 5 | 9 | | 6 | | |
| | | | 7 | 6 | | | 8 | |

# राजकीय, सामाजिक, जातीय सलोखा अबाधित राहण्याच्या दृष्टीने पत्रकारांचे काम - मालोजीराजे देशमुख



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** राजकीय, सामाजिक कायार्तील आपल्या बातम्या पाहून काम करण्याची प्रेरणा आम्हाला नेहमीच आपल्याकडून मिळत गेली. एस. एन. डी. स्कूल मध्ये विद्यार्थी घडवण्यासाठी आम्ही जे उपक्रम राबवतो त्याच्या बातम्या आपल्या दैनिकातून प्रसारित केल्याने एस. एन. डी. स्कूलचे नाव जिल्ह्यात, तालुक्यात मोठे करण्यात पत्रकारांचा हातभार असून राजकीय, सामाजिक, जातीय सलोखा अबाधित राहण्याच्या दृष्टीनेही पत्रकारांचे मोठे काम असल्याने दक्षता बाळगून बातमीदारी करत असल्याचे मत एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथील एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूल व रेणुका परिवार यांच्या वतीने पत्रकार दिनाचे औचित्य साधून घेण्यात आलेल्या पत्रकारांच्या सन्मान सोहळा प्रसंगी बोलत होते.यावेळी एस. एन. डी. स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख, अ‍ॅड. रणवीर देशमुख धनाजीराव देशमुख, सेक्रेटरी रोहित शेटे, शक्ती पलंगे यांच्या शुभहस्ते पत्रकार सुनील राऊत, आनंद जाधव, उमेश पोतदार, अभिजीत म्हामणे, अभिमन्यू आठवले श्रीकांत बाविसकर सुनील गजाकस विलास भोसले समीर सोरटे प्रमोद शिंदे मनोज राऊत यांना फेटा गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी पत्रकार विलास भोसले, सुनील राऊत, श्रीकांत बाविस्कर, प्रमोद शिंदे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संदीप पानसरे यांनी केले असून सूत्रसंचालन व आभार पीआरओ मनोज राऊत यांनी मानले.

# संग्राम नगरमध्ये 'जिजाऊ नगर' कॉलनीचे भव्य उद्घाटन



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** संग्राम नगर येथे नव्याने विकसित करण्यात आलेल्या कॉलनीस 'जिजाऊ नगर' असे नामकरण करण्यात आले असून, या कॉलनीचे भव्य उद्घाटन अकलूज नगर परिषदेचे नगरसेवक माननीय सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते पार पडले.

राजमाता जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून त्यानंतर मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर प्रेरणादायी भाषणे झाली. जिजाऊ ब्रिगेडच्या पुणे विभागीय अध्यक्ष प्रा. डॉ. मिनाक्षी अमोल जगदाळे यांनी जिजाऊंच्या विचारांचा व समाजघडणीत त्यांच्या योगदानाचा सविस्तर आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, "जिजाऊ नगर" हे नाव केवळ एका कॉलनीचे नसून प्रेरणादायी विचारांचे प्रतीक आहे. जिजाऊंनी दिलेले संस्कार, धैर्य आणि राष्ट्रभक्तीची शिकवण या नावातून प्रतिबिंबित होते. महिलांच्या सन्मानाचे व सक्षमीकरणाचे प्रतीक असलेले हे नाव समाजात नैतिक मूल्ये रुजवण्याचा संदेश देते. भावी पिढीसाठी आदर्श जीवनमूल्यांची ओळख करून देणारे आणि परिसराला ऐतिहासिक-सांस्कृतिक ओळख देणारे हे नाव सदैव अभिमानाने उच्चारले जाईल.'

संग्राम नगर ग्रामपंचायतीचे सरपंच माननीय अजित रेवंडे यांनीही मनोगत व्यक्त करत जिजाऊंच्या जीवनकार्यावर विचार मांडले, ग्रामपंचायतीविषयी माहिती दिली व कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास संग्राम नगरचे सरपंच अजित रेवंडे, उपसरपंच राचकर, प्रहार संघटनेचे संपर्कप्रमुख माननीय अमोल शिवाजी जगदाळे, युवासेना जिल्हाध्यक्ष गणेश इंगळे यांच्यासह सचिन गायकवाड, समर्थ जगदाळे, राजू सोनवणे, अनिल कदम, माने, शहाजी वाघ, डॉ. संतोष काटकर, डॉ. मंगेश शिंदे, डॉ. विशाल साळुंखे, अभिजीत वाघ, आकाश मुंजाळ, गणेश कदम, सचिन लोखंडे, सतीश रेवंडे, बबन शेंडगे, हनुमंत रेवंडे, गुणवंत अंधारे, सुमंत अंधारे, राजेश कांबळे, सावंत, जाधव, शकील भाई दस्तगीर, जिजाऊ ब्रिगेड उपाध्यक्ष सौ. सुषमा पाटील, सौ. पल्लवी काटकर, सौ. विद्या मुंगुसकर, सौ. विद्या साळुंखे, सौ. मनीषा कदम, सौ. विनोदिनी अंधारे, सौ. वाघ, कु. उज्वला आडणे, सौ. रेशमा ननवरे, सौ. देशमुख आदी मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोलशेठ जगदाळे यांनी केले तर आभार प्रदर्शन राजू सोनवणे यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

# संक्रांतीनिमित्त हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात लुटले महिलांनी पुस्तकाचे वाण



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मकर संक्रांतीनिमित्त छत्रपती ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या वतीने महिलांसाठी कर्तबगार जिजाऊ सावित्री अहिल्या रमाई यांच्या जीवन चरित्र वरीलपुस्तक आणि उपयुक्त वस्तूंचे (रुपी वाण) लुटण्याचे व हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाद्वारे महिलांना वाण म्हणून पुस्तके देऊन ज्ञानाचा प्रसार आणि उपयुक्त वस्तू देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

मकर संक्रांतीनिमित्त हळदी-कुंकू कार्यक्रमात केवळ पारंपरिक वस्तू न देता, पुस्तके वाटून ज्ञानाचे वाण लुटले.

मकर संक्रांतीला 'वाण लुटणे' ही प्रथा आहे, ज्यामध्ये महिला एकमेकींना उपयुक्त वस्तू भेट देतात. यावर्षी छत्रपती ब्रिगेडने महिलांना वाचण्याची आवड लागावी व ज्ञान मिळावे म्हणून पुस्तके वाटली.

यावेळी केवळ पुस्तकेच नाही, तर दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या वस्तू (रुपी वान) देखील वाटण्यात आल्या.

या सणात तीळ, गूळ, सुगडी आणि दैनंदिन उपयुक्त वस्तू (उदा. स्वयंपाकघरातील वस्तू, वाण) भेट देण्याची परंपरा आहे.

हा उपक्रम महिला सक्षमीकरण आणि ज्ञानाचा संदेश देणारा ठरला आहे. यावेळी छत्रपती ब्रिगेडच्या जिल्हा अध्यक्ष मोनाली धुमाळ जिल्हा कार्याध्यक्ष अध्यक्ष मोनाली धुमाळ जिल्हा कार्याध्यक्ष मनीषा कोळी शहर कार्याध्यक्ष सोनाली सगर राजनंदिनी धुमाळ, उज्वला यन्नले, अंबिका पवार, मिनाक्षी चव्हाण, सुनिता कुंभार सविता कुचन, गिता कोमाकुल, सविता बनसोडे, वेदिका श्रीगांधी आदी उपस्थित होते.

# चित्रकला परीक्षेत तडवळे कन्या शाळेचा 100 टक्के निकाल



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद आदर्श कन्या प्राथमिक शाळा कसबे तडवळे येथिल इयत्ता सातवी एलिमेंट्री ड्रॉईंग ग्रेड परीक्षा नोव्हेंबर 2025

मध्ये झाली होती. त्यामध्ये तेरा विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये शाळेतील 13 पैकी 13 विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून 100% टक्के निकाल चित्रकला ग्रेड परीक्षा चा लागला आहे.त्यामध्येअ ग्रेड मध्ये 10 विद्यार्थ्यांनी व इ ग्रेड मध्ये 3 विद्यार्थिनी असा अतिशय उत्कृष्ट निकाल लागला आहे. त्यामध्ये नंदिनी दीपक मते जेबा महेश सत्तार शेख, प्रांजली पोपट चव्हाण, सानिका सुरेश गुटे, सफिया मोमीन गौसिया, चंचल अमोल निकाळजे, आयेशा इक्बाल तांबोळी, वेदिका विनोद चव्हाण, आलिया तोफिक कोतवाल. आराध्या नितीन अडसूळ, स्नेहा परसराम कोरडे, सालिहा मुबारक तांबोळी, वैष्णवी बालाजी जमाले.

असा शंभर टक्के निकाल लागल्यामुळे सर्व यशस्वी विद्यार्थिनीचे, मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती ज्योती पंडित मॅडम (कलाशिक्षिका) व त्यांना सहकार्य करणाऱ्या प्रियंका आडसूळ/डुकरे यांचेही शाळा व्यवस्थापन समिती कसबे तडवळे तसेच शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद,जेष्ठ शिक्षक जगन्नाथ धायगुडे.पांडुरंग तनमोर शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका, पालकांकडून अभिनंदन होत आहे.

# शब्द झोपले तर समाज झोपतो- नूरजहाँ शेख



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शब्द झोपले तर समाज झोपतो, शब्द पेटले तर इतिहास बदलतो असे मत नूरजहा शेख यांनी व्यक्त केले.

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा मार्फत, अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर शहरात, आयोजित करण्यात आलेल्या चौथे युगस्त्री फातिमा शेख साहित्य संमेलनातील, कवी संमेलनाध्यक्ष नूरजहाँ शेख बोलत होत्या.

पुढे बोलताना शेख म्हणाल्या, कविता ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती अन्यायाविरुद्धची लढाई आहे, असे ठणकावून सांगताना अध्यक्षांनी कवी-लेखकांना निर्भीडपणे सत्य मांडण्याचे आवाहन केले. त्यांच्या आक्रमकपण संवेदनशील शैलीने उपस्थित रसिक भारावून गेले.

स्त्रीला दुय्यम ठरवणाऱ्या मानसिकतेवर त्यांनी निर्भिडपणे प्रहार करत लेखणीचे शस्त्र हे अन्यायाविरुद्धचे प्रभावी हत्यार असल्याचे ठणकावून सांगितले.

या संमेलनाचे उद्घाटक म्हणून प्रसिद्ध सहत्यिक डॉ.श्रीपाल सबनीस व सौ ललिता सबनीस तसेच संस्थापक शफी बोल्डेकर, कार्याध्यक्ष खजभाई बागवान, सह सचिव अनीसा शेख, जिल्हाध्यक्ष दीलशाद शेख, सम्मेलनअध्यक्ष मेहमूद शेख, समाजसेवक डॉ. सलीम शेख आदी साहित्यिक मान्यवर व राज्यभरातून आले कवी उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विजयराज डोंगरे यांना मिळाला 'दादाचा वादा'

## 'लोकशक्ती' परिवाराचे शेकडो कार्यकर्ते 'राष्ट्रवादी'त दाखल



**कुरुल (कटूसत्य वृत्त):-** तब्बल दीड दशक राष्ट्रवादीचं शिवाळ खांद्यावर घेऊन जिल्ह्याची मशागत करून जिल्हाभर 'घड्याळ' बहरून आणलेले ज्येष्ठ नेते मनोहर डोंगरे यांचे चिरंजीव सोलापूर जि.प. अर्थ बांधकाम माजी सभापती विजयराज डोंगरे यांच्यासह त्यांचा बलाढ्य असणारा लोकशक्ती परिवार यांनी 'राष्ट्रवादी पुन्हा' चा नारा दिल्यानंतर आज प्रत्यक्षात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात बारामती येथे अधिकृतपणे जाहीर प्रवेश केला असून महाराष्ट्राचे हेवीवेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'दादाचा वादा' डोंगरे गटाला मिळाला असल्याने लोकशक्ती परिवारात नवचैतन्य पसरले आहे.

सोलापूर जिल्हा हा कधी काळी राष्ट्रवादीचा बालेकिल्ला होता. चार - दोन मतदारसंघ वगळता जिल्ह्यात राष्ट्रवादीच्या घड्याळाची टिकटिक ज्येष्ठ नेते मनोहर भाऊ डोंगरे यांनी अविरथपणे चालू ठेवली होती. जास्तीचा काळ जिल्हाध्यक्ष पदावरती असल्याने मनोहर डोंगरे यांनी जबाबदारीचं शिवाळं खांद्यावरून खाली उतरलं आणि सुरू झाली पक्षाची वाताहात. मध्यंतरी तर चांगलाच पडझडीचा खडतर प्रवास राष्ट्रवादीला करावा लागला. गतवर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे पानिपत झाले. मात्र सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीची पुनर्बांधणी करायची हा विचार ठेवून न खचता, न थांबता ना.अजित पवार पुन्हा एकदा कामाला लागले आहेत. त्यामुळे मोहोळ तालुक्यातील अंतर्गत मतभेदामुळे राष्ट्रवादीला सोडून गेलेले आणि राष्ट्रवादीवर व पवार कुटुंबीयांवर कायम निष्ठा असणारे डोंगरे पिता-पुत्रांच्या खांद्यावर पुन्हा एकदा घड्याळाचे उपरणं टाकून स्वग्रही स्वागत केलं आहे.

ज्येष्ठ नेते मनोहर डोंगरे, माजी सभापती विजयराज डोंगरे यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी आज राष्ट्रवादीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांच्या उपस्थितीमध्ये बारामती येथे पक्ष प्रवेश केला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात विजयराज दादा यांना अजित दादांकडून कोणता शब्द मिळणार...? होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत किती बळ मिळणार...? राष्ट्रवादीकडून कोणती ताकद मिळणार...? याकडे राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे.

### डोंगरे यांच्यामुळे 'राष्ट्रवादी' वाढणार

राष्ट्रवादीतून बाहेर पडल्यानंतर गत जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये विजयराज डोंगरे यांनी जिल्हा परिषदेच्या ३ तर पंचायत समितीच्या ६ जागांवर वर्चस्व सिद्ध केले होते. पुढे जाऊन सलग ५ वर्ष जिल्हा परिषदेचे अर्थ व बांधकाम सभापती म्हणून काम पाहिले होते. त्यामुळे विजयराज डोंगरे यांनी राष्ट्रवादी पुन्हा चा नारा दिल्यानंतर मोहोळ तालुक्यासह जिल्ह्यात राष्ट्रवादी वाढणार असल्याचे भाकित व्यक्त केले जात आहे.

# बेकायदेशीर अटकेविरोधात न्यायालयाने पोलीस निरीक्षक व महासंचालकांना नोटीस

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):** सहा महिन्यांपूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १११ अचानक वाढवून सात जणांना अटक करण्यात आल्याच्या कारवाईविरोधात आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात धाव घेतली आहे. या अटकेला बेकायदेशीर ठरवत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर प्राथमिक सुनावणी घेत उच्च न्यायालयाने मोहोळ पोलीस निरीक्षकांसह राज्याचे पोलीस महासंचालक (डीजीपी) यांना 23 जानेवारीपर्यंत आपली बाजू मांडण्याचे आदेश दिले असल्याची माहिती आरोपींचे वकील अ‍ॅड. इरफान पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, मोहोळ पोलीस ठाण्यात 5 जुलै 2025 रोजी गुन्हा रजिस्टर क्रमांक 744/2025 अन्वये दानिश लियाकत कुरेशी व अन्य 12 जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यात तब्बल सहा महिन्यांनंतर, दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी मोहोळ पोलीस प्रशासनाने भारतीय न्याय संहितेचे कलम 111 वाढवत संशयित आरोपी दानिश लियाकत कुरेशी, मोहम्मद लियाकत कुरेशी, शहाबाज अबूतालीब कुरेशी, तौफिक अबूतालीब कुरेशी, इरफान इकबाल कुरेशी, दस्तगीर कोंडाजी कुरेशी आणि अरबाज अफजल कुरेशी या सात जणांना अटक केली होती.

या प्रकरणात कलम 111 ची वाढ आणि त्याआधारे करण्यात आलेली अटक ही कायदेशीरदृष्ट्या चुकीची व बेकायदेशीर असल्याचा मुद्दा आरोपींच्या वतीने अ‍ॅड. इरफान रियाज पाटील यांनी मोहोळ न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला होता. मात्र, रिमांड सुनावणीदरम्यान सद्यस्थितीत कलमवाढीचा मुद्दा विचारात घेता येणार नसल्याचे नमूद करत मोहोळ न्यायालयाने आरोपींना मुक्त करण्याची मागणी फेटाळली होती.

या आदेशाविरोधात बुधवार, दिनांक 14 जानेवारी रोजी आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात याचिका दाखल केली. याचिकेमध्ये मोहोळ पोलिसांनी केलेली अटक बेकायदेशीर ठरवून आरोपींना तात्काळ मुक्त करावे, दाखल गुन्ह्याचा पुढील तपास स्थगित ठेवावा, तसेच बेकायदेशीर अटकेपोटी मोहोळ पोलीस प्रशासनाकडून प्रत्येकी 50 लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

आरोपींच्या वतीने अ‍ॅड. अक्षय जगताप यांनी केलेला प्राथमिक युक्तिवाद ग्राह्य धरत उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने मोहोळ पोलीस प्रशासनासह राज्याचे पोलीस महासंचालक यांना नोटीस बजावत 23 जानेवारीपर्यंत आपली बाजू मांडण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणात आरोपींच्या वतीने अ‍ॅड. अक्षय जगताप, अ‍ॅड. इरफान पाटील, अ‍ॅड. दादाराव पवार, अ‍ॅड. दत्ता वाघमोडे, अ‍ॅड. इमरान पाटील आणि अ‍ॅड. तौफिक सरकाझी आदी वकिलांनी काम पाहिले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे या प्रकरणात पुढील कायदेशीर घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मतदानच्या शेवटी दोन गटात तुफान हाणामारी, दोन जण जखमी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील 29 महानगरपालिका निवडणुकीसाठीची मतदान प्रक्रिया पार पडली आहे. या मतदानावेळी अनेक ठिकाणी गोंधळ झाल्याचं पाहायला मिळालं. बोगस मतदान, मतदान यंत्रातील बिघाड, बोटावरील शाई पुसणे, दुसऱ्याच व्यक्तीने मतदान करुन जाणे तर काही ठिकाणी पैसे वाटप करुन गेल्यासह मतदान करतानाचे व्हिडिओ देखील व्हायरल झाल्याचं पाहायला मिळालं.

दरम्यान, सोलापुरात मतदानच्या शेवटच्या वेळी दोन गटात जोरदार भांडण झाल्याची घटना घडली आहे. सोलापुरातल्या किडवाई चौक परिसरात दोन गटात तुफान हाणामारी झाली आहे.

### राजकीय पूर्ववैमन्यासातून खलिफा आणि मैंदर्गीकर या दोन गटात वाद

राजकीय पूर्ववैमन्यासातून खलिफा आणि मैंदर्गीकर या दोन गटात वाद झाल्याची माहिती मिळाली आहे. दोन्ही गटातील एक एक व्यक्ती जखमी असल्याची माहिती मिळाली आहे. या भांडणानंतर पोलीस उपायुक्तसह पोलीस अधिकाऱ्यांचा मोठा फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला आहे. साडे पाट वाजण्याच्या आधी मतदान केंद्रावर पोहोचलेल्या मतदारांची मतदान प्रक्रिया सुरळीत सुरु आहे. दरम्यान, सोलापुरात मतदान संपल्यानंतर शहरात काही ठिकाणी किरकोळ वादावादी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यानंतर खुद्द पोलीस आयुक्त रस्त्यावर उतरल्याचं चित्र पाहायला मिळालं.

### सोलापूर महापालिकेच्या 102 जागांसाठी 1091 मतदान केंद्रांवर मतदान झाले

मतदानाला केवळ एक तास उरला असतानाही सोलापूर शहरातील अनेक केंद्र पडली ओस पडल्याचं चित्र पाहायला मिळालं. मतदानाचा टक्का मोठ्या प्रमाणात घटणार असल्याचे यावरून दिसत आहे. दुपारी साडेचार पर्यंत 42 ते 45 टक्के एवढेच मतदान झाले होते. काही कामगार वस्त्या वगळता 80 टक्के बूथ रिकामे दिसत आहेत. सोलापूर महापालिकेच्या 102 जागांसाठी 1091 मतदान केंद्रांवर मतदान झाले.

### सोलापुरात प्रभाग 15 मध्ये भाजप आणि काँग्रेसच्या उमेदवारांकडून निकाला आधीच जल्लोष

दरम्यान, यावेळी सोलापूर महानगरपालिकेतील मतदानाचा टक्का घसरला आहे. अंदाजे सोलापूर महानगरपालिकेसाठी 52 ते 55 टक्के मतदान झाल्याची माहिती मिळत आहे. सोलापुरात प्रभाग 15 मध्ये भाजप आणि काँग्रेसच्या उमेदवारांकडून निकाला आधीच जल्लोष करण्यात आला आहे. दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष केला आहे. दोन्ही बाजुचे कार्यकर्ते एकमेकांस्मार आल्याने काही वेळ गोंधळ निर्माण झाला होता. काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे हे प्रभाग 15 ड तर भाजपचे विनोद भोसले 15 क मधून उमेदवार आहेत.


# पाहिजेत

दैनिक सोलापूर कटूसत्य www.katusatya.in
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

सोलापूर वृत्तदर्पण व दैनिक कटूसत्य या माध्यमांच्या वतीने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापक | २ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १५००० ते २०००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| २) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | १०००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| ३) | सह संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ४) | उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ५) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ३००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ८) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ९) | प्रशिक्षण अधिकारी | १ | एम. बी.ए. / पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रुपये. | असल्यास प्राधान्य |
| १०) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | ५००० ते १५००० रु. व कमिशन | असल्यास प्राधान्य |

**नियम व अटी :-** १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरुन, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ४५ वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करु शकतो. ३) सर्व अधिकार वृत्तदर्पण कडे राखीव राहतील आणि ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. वृत्तदर्पण चा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

फोन : 0217-2605091 मो.9657069069

संपर्क :- वृत्तदर्पण कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, चेतन फॉन्ड्रीसमोर, होटगी रोड, सोलापूर-३.